जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ६३३ दिनांक - २०/०८/२०२३**

येरवडा पोलीस ठाणे पुणे शहर

## मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी कार्यभार स्वीकारल्या पासुनची ५० वी मकोका कारवाई

## अभिषेक ऊर्फ अभि रमेश तांबे (टोळी प्रमुख) व त्याचे इतर ०२ साथीदार यांचेविरुध्द मकोका अंतर्गत कारवाई

आरोपी नामे १)अभिषेक उर्फ अभि रमेश तांबे,वय २१ वर्षे,रा.लेन नं.८,मुंजाबा वस्ती,धानोरी,पुणे (टोळी प्रमुख) २)सुमित नागेश लंगडे,वय २५ वर्षे रा.इंदिरानगर,बर्मासेल लोहगाव रोड,पुणे ३)प्रज्वल प्रशांत शिंदे,वय १८ वर्षे, रा.स.नं.५५/१,तिरूपती इन्क्वलेव्ह,गोकुळनगर,बस स्टॉप,धानोरी रोड पुणे (टोळी सदस्य) यांनी दिनांक ०५/०७/२०२३ रोजी ५०९ चौक,लोहगांव,पुणे येथे फिर्यादी याचे आत्याचा मुलगा यांचेशी झालेल्या भांडणाचे कारणावरून त्याला मारण्यासाठी शोधत होते. परंतु तो मिळुन आला नाही म्हणुन त्याचेबाबत त्यांनी फिर्यादी यांना विचारपुस केली असता,फिर्यादी यांनी त्यांचा आत्याचा मुलगा कोठे आहे हे मला माहित नाही असे सांगितल्याने त्याचा राग धरून,त्याच्या हातामधील धारदार हत्यार फिर्यादी यांना जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांच्या डोक्यावर मारून त्यांना गंभीर जखमी केले व सदर परिसरात दहशत पसरवली म्हणुन फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने **येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं.४६४/२०२३,भा.द.वि.कलम ३०७,३२३, ५०४,५०६,३४ आर्म ॲक्ट कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)सह १३५,क्रिमीनल लॉ ॲमेंडमेंट कलम ३ व ७** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दाखल गुन्ह्याच्या तपासा दरम्यान यातील आरोपी नामे **१)अभिषेक उर्फ अभि रमेश तांबे,वय २१ वर्षे,रा.लेन नं.८,मुंजाबा वस्ती धानोरी,पुणे (टोळी प्रमुख) २)सुमित नागेश लंगडे,वय २५ वर्षे,रा.लेन नं. आय-१,इंदिरानगर,बर्मासेल लोहगाव रोड,पुणे ३)प्रज्वल प्रशांत शिंदे,वय १८ वर्षे,रा.स.नं.५५/१,फ्लॅट नं. ६७,तिरूपती इन्क्वलेव्ह,गोकुळनगर,बस स्टॉप,धानोरी रोड,पुणे (टोळी सदस्य)** यांना दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे.

सदर आरोपी **अभिषेक उर्फ अभि रमेश तांबे (टोळी प्रमुख)** याने त्याचेसह अन्य सदस्यांसाठी आपले अधिपत्याखाली प्रत्येक गुन्ह्यात काही सामाईक व काही नवीन साथीदार यांना सोबत घेवुन स्वतःचे संघटीत टोळी तयार करुन,स्वतःचे टोळीचे वर्चस्व निर्माण करण्यासाठी गुन्हे केले असुन,त्यामध्ये खुन करणे, खुनाचा प्रयत्न करणे,खंडणी मागणे,धारदार हत्यारे जवळ बाळगुन दहशत करणे इत्यादी सारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे वारंवार केलेले आहे. त्यांचेवर प्रतिबंधक कारवाई करुन,सुध्दा त्यांनी पुन्हा पुन्हा गुन्हे केले आहेत.

यातील आरोपी यांनी संघटीतपणे दहशतीचे मार्गाने बेकायदेशिरपणे स्वतःचे वर्चस्व निर्माण करण्या साठी सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आल्याने,तसेच त्यांचे वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्ह्यास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१)(ii),३(२),३(४) प्रमाणे अंतर्भाव करण्यासाठी पोलीस निरीक्षक,(गुन्हे),येरवडा पोलीस स्टेशन,पुणे,श्रीमती.कांचन जाधव यांनी वरीष्ठ पोलीस निरीक्षक,येरवडा पोलीस स्टेशन,पुणे शहर,श्री.बाळकृष्ण कदम यांचे व मा.पोलीस उप-आयुक्त,परीमंडळ ०४ पुणे शहर श्री.शशिकांत बोराटे यांचे मार्फतीने मा.अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा यांना प्रस्ताव सादर केला होता.

सदर प्रकरणाची छाननी करुन येरवडा पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नंबर ४६४/२०२३ भा.द.वि.कलम ३०७,३२३,५०४,५०६,३४ आर्म ॲक्ट कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) सह १३५ क्रिमीनल लॉ ॲमेंडमेंट कलम ३ व ७ प्रमाणे दाखल असलेल्या गुन्ह्यात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम३(१)(ii),३(२),३(४)प्रमाणेचा अंतर्भाव करण्याची मा.अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर,श्री.रंजनकुमार शर्मा यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास मा.सहायक पोलीस आयुक्त,येरवडा विभाग,पुणे शहर,श्री.संजय पाटील हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.पोलीस आयुक्त,पुणे शहरश्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप आयुक्त श्री.शशिकांत बोराटे, मा.सहा पोलीस आयुक्त श्री.संजय पाटील यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,येरवडा पोलीस स्टेशन,पुणे शहर श्री.बाळकृष्ण कदम पोलीस निरीक्षक,गुन्हे,श्रीमती. कांचन जाधव, पोलीस उप निरीक्षक,रविंद्रकुमार वारंगुळे, सर्व्हेलन्स पथकातील पोलीस अंमलदार,सचिन माळी, सचिन शिंदे, पवार व देविदास वांढर यांनी सदरची कारवाई केली आहे.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार यांनी पोलीस आयुक्त म्हणुन कार्यभार घेतल्यानंतर गुन्हेगारी नियंत्राणांवर बारकाईने लक्ष देवुन शरीराविरुध्द व मालमत्ते विरुध्द गुन्हे करणारे व नागरीकांमध्ये दहशत निर्माण करणारे सराईत गुन्हेगार यांचे हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवुन,गुन्हेगारीचे समुळ उच्चाटन होईल यावर भर देण्या बाबत सर्व पोलीस अधिकारी व अमंलदार यांना निर्देश देण्यात आलेले आहेत.**त्यांचे मार्गदर्शनाखाली मकोका अंतर्गत केलेली ही ५० वी कारवाई आहे.**